असा. क्र. ५४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, ऑक्टोबर ५, २००५/आश्विन १३, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.**—महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ याचे निरसन करण्याची आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींची तरतूद करण्याकरिता अध्यादेश. ४९१–४९३

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २००५.

## MAHARASHTRA ORDINANCE No. VII OF 2005.

AN ORDINANCE TO PROVIDE FOR REPEAL OF THE MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION ACT, 2002 AND FOR CERTAIN MATTERS INCIDENTAL THERETO.

## सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.

**महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ याचे निरसन करण्याची आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींची तरतूद करण्याकरिता अध्यादेश.**

२००५ चा २२. २००३ चा महा. ३१. **ज्याअर्थी,** संसदेकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अधिनियमित करण्यात आला आहे, आणि म्हणून, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसित करणे आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे असे वाटते ;



[ किंमत : रुपये ९ ०० ]

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसित करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; २००३ चा महा. ३१

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसन) अध्यादेश, २००५ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ११ ऑक्टोबर २००५ रोजी अंमलात येईल.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याचे निरसन व व्यावृत्ती.

**२.** (१) महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००३ चा महा. ३१.

(२) असे निरसन झाले असले तरीही, या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकास,

(क) शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेले सर्व अर्ज ; आणि

(ख) अपिलीय प्राधिकारी किंवा लोक आयुक्त किंवा यथास्थिति, उप लोक आयुक्त यांच्याकडे प्रलंबित असलेली सर्व अपिले,

जणू काही, हा अध्यादेश प्रख्यापित केलेला नव्हता असे मानून, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ याच्या तरतुदींनुसार पुढे चालू ठेवण्यात येतील व ते निकालात काढण्यात येतील. २००३ चा महा. ३१.

## निवेदन.

राज्यकारभारामध्ये पारदर्शकता, खुलेपणा आणि जबाबदारी निर्माण करण्याचा मार्ग सुलभ करण्याच्या दृष्टीने, तसेच लोकशाही समाजरचनेमध्ये लोकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, राज्यात, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ (२००३ चा महा. ३१) करण्यात आला. माहितीचा अधिकार या विषयावर संपूर्ण भारतात एकरूप कायदा असावा याकरिता, संसदेने अलिकडेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) केला असून, संसदेचा उक्त अधिनियम दिनांक १२ ऑक्टोबर २००५ पासून संपूर्ण भारतभर अंमलात येईल. ही वस्तुस्थिती विचारात घेता, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ हा निरसित करणे, महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते.

२. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे अधिवेशन चालू नाही, आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसित करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ४ ऑक्टोबर २००५.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यबीर एस. डोड,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ९१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, ऑक्टोबर ५, २००५/आश्विन १३, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Right to Information (Repeal) Ordinance, 2005 (Mah. Ord. VII of 2005), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[ Translation in English of the Maharashtra Right to Information (Repeal) Ordinance, 2005 (Mah. Ord. VII of 2005), published under the authority of the Governor ].

---

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 5th October 2005.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VII OF 2005.**

*AN ORDINANCE*

*to provide for repeal of the Maharashtra Right to Information Act, 2002 and for certain matters incidental thereto.*

22 of 2005. Mah. XXXI of 2003. WHEREAS the Right to Information Act, 2005 has been enacted by the Parliament and, therefore, it is considered expedient to repeal the Maharashtra Right to Information Act, 2002, and to provide for certain matters incidental thereto ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to repeal the Maharashtra Right to Information Act, 2002, for the purposes aforesaid; Mah. XXXI of 2003.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Right to Information (Repeal) Ordinance, 2005.

(*2*) It shall come into force on the 11th October 2005.

Repeal of Mah. XXXI of 2003 and saving.

**2.** (*1*) The Maharashtra Right to Information Act, 2002, is hereby repealed. Mah. XXXI of 2003.

(*2*) Notwithstanding such repeal,—

(*a*) all applications pending with the Public Information Officers ; and

(*b*) all appeals pending with the appellate authorities or the Lokayukta or Upa-Lokayuktas, as the case may be,

on the date of commencement of this Ordinance shall be continued and disposed of in accordance with the provisions of the Maharashtra Right to Information Act, 2002, as if this Ordinance had not been promulgated. Mah. XXXI of 2003.

STATEMENT

The Maharashtra Right to Information Act, 2002 (Mah. XXXI of 2003) has been enacted in the State with a view to pave way for transparency, openness and accountability in governance of the affairs of the State and ensure effective participation of the people in democratic society. In order to have a uniform law all over India on the subject of right to information, recently the Parliament has enacted the Right to Information Act, 2005 (22 of 2005). The said Act of Parliament shall come into force with effect from the 12th October 2005 all over India. Having considered the above fact, the Government of Maharashtra considers it expedient to repeal the Maharashtra Right to Information Act, 2002.

2. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to repeal the Maharashtra Right to Information Act, 2002, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 4th October 2005.

S. M. KRISHNA,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYABIR S. DODD,
Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई